# प्रेसनोट

दि.१५/०४/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | सुदाम लक्ष्मण रोकडे, वय–५२ वर्ष, सहायक निबंधक, वर्ग–२, सहकारी संस्था, अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १,००,०००/– तडजोड अंती रुपये ५०,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ५०,०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी एका पतसंस्थेकडुन २०१४ मध्ये सोने तारण ठेऊन ३०,०००,००/– रुपये कर्ज घेतले होते. संबंधीत प्रकरणात पतसंस्थेने तक्रारदार यांचे विरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. तक्रारदार यांनी न्यायालयाचे आदेशानुसार पतसंस्थेचे कर्जाची सर्व रक्कम भरली असतानाही पतसंस्थेने तक्रारदार यांचे विरुध्द सहकारी पतसंस्था फेडरेशन अहमदनगर यांचेकडे कलम १०१ नुसार तक्रारदार यांचेकडुन वसुलीची कारवाई करणेचे आदेश मिळणेकरीता प्रकरण दाखल केले होते. सदर प्रकरणात आरोपी लोकसेवक सुदाम लक्ष्मण रोकडे, सहायक निबंधक, वर्ग–२, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी तक्रारदार यांचे बाजुने निकाल दिला होता. तक्रारदार यांचे बाजुने निकाल दिला म्हणुन त्याचे मोबदल्यात आरोपी लोकसेवक रोकडे यांनी तक्रारदार यांचेकडे आज दि.१५/४/२०२१ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान रु. १,००,०००/– ची मागणी करुन तडजोडअंती रु.५०,०००/– लाचेची मागणी पंचासमक्ष करुन आज दि.१५/४/२०२१ रोजी कायनेटिक चौक येथील हॉटेल जस्ट ईन अ‍ॅव्हेन्यु मध्ये आयोजित लाचेचा सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून रुपये ५०,०००/– लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

अ‍ॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

. 15/04

(हरिश खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर